# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**<u>प्रसिद्धी पत्रक                                                                ता. १८ फेब्रुवारी २०१९</u>**

# नियमित पाणी पुरवठ्यासंबंधी आवश्यक ती कार्यवाही तातडीने पूर्ण करा

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश : नेहरूनगर झोनमध्ये 'जनसंवाद'

**नागपूर, ता. १८ :** पाणी ही मानवाची मुलभूत गरज आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना नियमीत व वेळेवर पाणी मिळणे आवश्यक आहे. मात्र आज संपूर्ण शहरात पाण्याचीच समस्या अग्रणी आहे. दहाही झोनमधील 'जनसंवाद'मध्ये सुद्धा पाण्याच्या सर्वाधिक तक्रारी पुढे आल्या आहेत. त्यामुळे पाण्याच्याबाबतीत जबाबदारीने काम करून नियमीत पाणी पुरवठा व्हावा यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने पूर्ण करा, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

नेहरूनगर झोनमध्ये 'जनसंवाद' कार्यक्रमात सोमवारी (ता.१८) पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या व त्या समस्या सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांना निर्देशित केले. नेहरूनगर झोनमधील दत्त मंदिर सुदामपुरी मैदानात आयोजित 'जनसंवाद' कार्यक्रमाला महापौर नंदा जिचकार, आमदार सुधाकर कोहळे, आमदार कृष्णा खोपडे, तुमसरचे आमदार चरण वाघमारे, आयुक्त अभिजीत बांगर, जलप्रदाय समिती सभापती विजय झलके, परिवहन समिती

सभापती जितेंद्र कुकडे, क्रीडा समिती सभापती नागेश सहारे, दुर्बल घटक समिती सभापती हरीश दिकोंडवार, नेहरूनगर झोन सभापती रिता मुळे, प्रतोद दिव्या धुरडे, नगरसेविका स्नेहल बिहारे, समिता चकोले, मनिषा कोठे, रेखा साकोरे, वंदना भुरे, मंगला गवरे, अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, सहायक आयुक्त हरीश राउत, पोलिस उपायुक्त निलेश भरणे यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख व विविध शासकीय कार्यालय, तसेच ओसीडब्ल्यू, एसएनडीएलचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी नेहरूनगर झोनमधील दोनशेच्यावर तक्रारींचा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निपटारा केला. नेहरूनगर झोनमधील दर्शन कॉलनी, सुदामपुरी, भांडेप्लॉट, राजेंद्रनगर, न्यू डायमंड नगर, वाठोडा, संत गाडगेबाबा नगर, भाग्यश्री नगर, बापूनगर, ओमनगर, दत्तात्रयनगर यासह अनेक भागात नागरिकांना पाण्याच्या अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. गढूळ पाणी, नियमीत पाणी पुरवठा न होणे, अल्पवेळ पाणी पुरवठा, अवाजवी पाणी बिल अशा अनेक समस्यांमुळे दररोजच नागरिकांना मन:स्ताप सहन करावा लागतो. नागरिकांचा वाढता रोष पाहता पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ओसीडब्ल्यूच्या अधिका-यांना चांगलेच फटकारले. संपूर्ण शहरातच पाण्याच्या अनेक समस्यांचा नागरिकांना मन:स्ताप सहन करावा लागत आहे. यासंबंधी नेहरूनगर झोनमध्ये प्रथम पाण्यासंबंधी अडचणी असणा-या भागामध्ये सर्व्हे करून येत्या सात दिवसांमध्ये आयुक्तांपुढे अहवाल सादर करून केलेल्या कार्यवाहीची माहिती देणे, तसेच १५ दिवसांनी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेत बैठकीत कार्यवाहीची माहिती देण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. याशिवाय शहरातील संपूर्ण विहिरींची स्वच्छता करून तिथे लघुनळ योजनेद्वारे नागरिकांना पाणी उपलब्ध करून देणे असेही निर्देश त्यांनी दिले. पाण्याच्या समस्येचे गांभिर्य जपत मनपाच्या डेलिगेट्सनी ओसीडब्ल्यूच्या कर्मचा-यांवर नियंत्रण ठेवण्याचे यावेळी आयुक्त अभिजीत बांगर यांनी निर्देशित केले.

सक्करदरा येथील श्रीमंत राजे रघुजी भोसले पुतळ्याच्य सौंदर्यीकरणाची मागणी यावेळी नागरिकांनी केली. या ठिकाणी विद्युत व्यवस्था व इतर सर्व बाबींची पूर्तता

करून सौंदर्यीकरण करण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. झोनमध्ये विविध ठिकाणी अवैध बांधकामाचीही तक्रार यावेळी करण्यात आली. झोनमधील १८ मीटरच्या पांदण रस्त्याच्या बांधकामात अडसर ठरणा-या ७७ झोपड्यांचे पुनर्वसन करून त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घर देणे व पांदण रस्त्याबाबतची कार्यवाही करण्याचेही पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निर्देशित केले.

मानेवाडा चौक ते वाठोडा चौकापर्यंत रिंग रोडवरील अनधिकृत भंगार दुकानांमुळे परिसरात वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. शिवाय नागरिकांनाही अनेक प्रकारचे त्रास सहन करावे लागतात. झोनमधील सर्व अनधिकृत भंगार दुकानांची यादी तयार करुन या दुकानांचे सर्व्हे करणे व अतिक्रमण हटविण्याची कारवाई करणे, शिवाय अशा अनधिकृत भंगार दुकानांमधील विद्युत कनेक्शनही तोडण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. झोनमधील इतरही अतिक्रमणाच्या तक्रारींबाबत योग्य तपासणी करून कारवाई करण्याचे त्यांनी निर्देशित केले. याशिवाय दिघोरी चौक ते मानेवाडा चौकादरम्यान मार्गावर रेतीचे ट्रक रस्त्यावरच उभे ठेवण्यात येतात. या मार्गावर सिमेंट रोडचे बांधकाम सुरू असून रस्त्याच्या एकाच बाजूने वाहतूक सुरू आहे. रस्त्यावरच रेतीचे ट्रक उभे राहत असल्याने परिसरात वाहतुकीची मोठी समस्या निर्माण होत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारीवर आमदार सुधाकर कोहळे यांनी लक्ष वेधले. शिवाय भांडेप्लॉट ते दिघोरी चौकापर्यंतही रस्त्यावर वाहनांच्या पार्किंगची समस्या आहे. दोन्ही तक्रारींसंबंधी आज सायंकाळपासूनच कारवाई करण्यात येणार असल्याचे यावेळी पोलिस उपायुक्त निलेश भरणे यांनी सांगितले.

रमाई घरकुल योजनेबाबत हयगय करण्यात आल्याने २००८-२००९ या वर्षातील ३५ ते ४० नागरिकांना योजनेपासून वंचित राहावे लागले. रमाई घरकुल योजनेचा नागरिकांना लाभ न मिळवून देणे हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. यासंबंधी हयगय करणा-या संबंधित अधिका-याच्या वेतनवाढी थांबविण्याची कारवाई करणे व दोन

मार्चच्या आत वंचित लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळावा याबाबत कार्यवाही करण्याचेही पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निर्देशित केले.

न्यू गाडगेबाबा नगरमध्ये विद्युत व्यवस्था नसल्याची तक्रार करण्यात आली. यासंबंधी विद्युत व्यवस्था नसलेल्या ठिकाणी संबंधित अधिका-यांनी भेट देउन विद्युत खांब लावून विद्युत दिव्यांची व्यवस्था करण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. झोनमधील मोकळ्या भूखंडातील अस्वच्छतेबाबतही नागरिकांनी तक्रार केली. अशा मोकळ्या भूखंडामध्ये स्वच्छता करून भूखंड धारकाकडून स्वच्छतेचे भाडे वसूल करणे शिवाय भूखंडावर मनपाचे जप्तीचे फलक लावून ते लिलावात काढण्याचे निर्देश यावेळी आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले. शहरात सर्वत्र स्वच्छता राहावी यासाठी हा उत्तम निर्णय असून ही योजना संपूर्ण शहरात राबविण्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निर्देशित केले.

निर्मल नगरी रस्ता बांधकामाबाबत निधी मंजूर आहे शिवाय या कामासाठी पत्रही देण्यात आले मात्र अद्याप काम सुरू झाले नाही. रस्त्याचे काम होउ नये यासाठी निर्मल नगरीच्या संस्थापकाकडून गुंडागर्दी करून नागरिकांमध्ये दहशत निर्माण केली जात असल्याची तक्रार नागरिकांनी केली. नागरिकांना भिती दाखवून अस्वस्थता निर्माण करणा-या संचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.
याशिवाय बापूनगर येथील अवैध बांधकाम, विविध भागामध्ये स्वच्छता, नगर रचना विभागातील दलालांवर कारवाई, ड्रेनेज लाईन, भांडेवाडीतील कुत्रे व डूकरांची समस्या आदी समस्यांबाबत योग्य कार्यवाही करणे. कबीर नगरमधील मिरे लेआउट येथील अतिक्रमण कारवाई करण्याबाबत नागपूर सुधार प्रन्यासच्या सभापतींसोबत बैठक आयोजित करणे यासह ‘जनसंवाद’मध्ये निर्णय न झालेल्या समस्यांबाबत बैठक आयोजित करण्याचे निर्देशही पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.